# ज्ञानकर्मसंन्यासयोग

## अध्याय - ४ था

तिसऱ्या अध्यायात भगवंतांनी ज्ञानाची थोरवी थोडक्यात सांगितली. कर्माला ज्ञानाचे डोळे आणि भक्तीचे अंतःकरण लाभले की मानवाचे कर्म निष्काम कर्मयोगात पालटते. त्याच ज्ञानाची महती या अध्यायात आणखी विस्ताराने सांगत आहेत. ज्ञानाच्या प्राप्तीतले दोन मोठे अडथळे म्हणजे काम आणि क्रोध! त्यातही काम हा प्रधान वैरी.

काम क्रोध आड पडिले पर्वत। राहिला अनंत पैलीकडे॥

काम क्रोधांच्या पर्वतापलीकडे जगाचा नारायण असतो. पण एकदा का त्या कामक्रोधांना विवेकाने जिंकले की उपासक ज्ञानाकडे झेपावतो. मग त्याचे कर्म निष्काम होते. ही अकर्माची कला संतांना पुसावी. प्रत्यक्ष परमेश्वर सहस्र फणांच्या शेषावर पहुडला असूनही शांत आहे. त्याचप्रमाणे संत सहस्रावधि कर्मे करीत असूनही इवला-देखील क्षोभतरंग मानससरोवरात उठू देत नाहीत. कर्मे करून ती पुसून टाकतात. कितीही कर्मे केली तरी त्यांना श्रम वाटत नाहीत त्यांचे मन ध्रुवाप्रमाणे शांत स्थिर व तेजोमय राहते.

हा योग सांगताना भगवंत अर्जुनाला म्हणतात- हे मी काही नवीन तत्त्वज्ञान सांगत नाही. ते पूर्वीचेच आहे. फक्त समाज ते विसरला एवढेच।

(१) (२) जीवनाचे प्राथमिक नियम मनन करणाऱ्या मनूने ते सूर्यापासून स्वीकारले. म्हणजे ज्या धर्माने (ऋत) विश्व चालले आहे. तो धर्म मनू सूर्यापासून शिकला.

मनू - Legislation लेजिस्लेशन
राजा - Execution एक्झिक्युशन

© www.madhaveeraghuveer.com

# 22 May Friday

Week 21
142-223

2009

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

पुढे स्वार्थी व इंद्रियलोलुप झालेला मानवसमाज तो धर्म विसरला. तोच धर्म मी पुन्हा सांगत आहे. हा योग मीच पूर्वी सूर्याला, सूर्याने मनुला, मनुने इक्ष्वाकुला सांगितला होता. राजर्षींनी तो जाणला. पुढे कालौघात तो नष्ट झाला. समाज त्या तत्त्वचिंतनाला वंचित झाला.

(३) तुझ्या निमित्ताने तेच तत्त्वचिंतन मी प्रकट करीत आहे. तू माझा सखाही आहेस आणि भक्तही आहेस. म्हणून हे उत्तम रहस्य मी तुला सांगत आहे. केवळ कुरुक्षेत्रावर युद्धाला प्रवृत्त करण्यासाठी मी हे सांगत नाही तर हा योगमार्ग अनादि आहे तो मी तुला सांगतो

(४) यावर अर्जुन जो प्रश्न विचारतो तो स्थूल देहाला धरून आहे. अर्जुन महाचतुर श्रोता आहे. तो मोठा मार्मिक प्रश्न विचारतो - तुझा जन्म अलीकडचा आहे आणि सूर्याचा जन्म कितीतरी काळापूर्वीचा आहे. तर तू हे तत्त्वज्ञान सूर्याला सांगितलेस हे मला कसे खरे वाटावे?

सूर्य हा श्रेष्ठ कर्मयोगी आहे. सविता म्हणजे प्रसविता. सूर्य उदय पावण्याच्या पूर्वीच्या स्थितीला सविता असे म्हणतात. सूर्य हा जगताचा नेत्र आहे. सूर्य ठरल्या वेळेलाच उगवणार. ठरल्या वेळेलाच मावळणार - ह्या वैश्विक नियमांना ऋत असे म्हणतात. सत्य हे सापेक्ष असते पण ऋत हे कधीही न बदलणारे असते.

© www.madhaveeraghuveer.com

सत्याची सांगड ऋताशी घालता यायला हवी. ऋत हे आचरायला कठीण असते पण ऋताधिष्ठित नियमांना अनुसरून जेव्हा मनुष्य वागतो तेव्हा त्याचेही कल्याण होते आणि समाजाचेही कल्याण होते. ∴ अथर्वशीर्षात म्हटले आहे ऋतं वच्मि। सत्यं वच्मि। त्याचा भावार्थ असा आहे की वैश्विक नियमांचे पालन मानवाला करता आले पाहिजे. ते जर करता आले नाही तर आत्मोन्नतीचा मार्ग तर दिसत नाहीच पण स्वधर्मही आचरता येत नाही.

१४ मनुंपैकी वैवस्वत मनु हा सातवा मनु आहे. एका मनुचा कालखंड संपला आणि दुसऱ्या मनुचा कालखंड सुरु झाला की त्याला मन्वंतर असे म्हणतात. एका मन्वंतरात ७१ चतुर्युगे असतात. ब्रह्मदेवाचा दिवस ४३२ कोटी वर्षांचा आणि तेवढीच रात्रही असते.

इक्ष्वाकु हा वैवस्वत मनुचा ज्येष्ठ पुत्र होता. तो इक्ष्वाकु वंशाचा (प्रभू रामचंद्राच्या वंशाचा) आद्य संस्थापक होता.

पूर्वी राजर्षींचा समाजाला धाक होता. हे राजे तपःपूत, सदाचारी आणि नैतिक मार्गाने जाणारे असे होते. परंपरा जपण्याचे काम राजाला करावे लागते. राजा कालस्य कारणम्। राजर्षींनी हा कर्मयोग जाणला, जपला व आचरलाही. परंतु पुढे पुढे माणसे जशी स्वधर्मापासून, स्वकर्मापासून च्युत झाली तसतशी ही परंपरा खंडित झाली.

Sunday 24

©www.madhaveeradhuveer.com

| April | | | | | | May | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 | Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 | Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 | Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | | Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | | Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | | Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

ईश्वराने ही सृष्टी चालू रहावी म्हणून त्रिगुणात्मक सृष्टी निर्मिली. नाहीतर सारेजण सात्त्विक गुणाने मोक्षपदाला पोहोचले असते, तर पृथ्वी निर्मनुष्य झाली असती. म्हणून ईश्वराने जसे त्रिगुण दिले तसा योगही सांगितला. आणि आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. म्हणून ही परंपरा जागरूक होऊन जपली पाहिजे. राजा भ्रष्ट झाला की राज्य भ्रष्ट होते. समाज मोहग्रस्त झाल्यामुळे बराच काळ व्यर्थ गेला आणि ही निष्काम कर्मयोगाची परंपरा खंडित झाली. ती आता पुन्हा भगवंत अर्जुनाच्या योगाने सांगत आहेत. अनासक्त कर्मयोग ही गीतेची जगाला मिळालेली महान देणगी आहे. इतके विलक्षण तत्त्वज्ञान जगाच्या इतिहासात कोणत्याही वाङ्मयात पहायला मिळणार नाही.

आधीच विवेकाची गोठी ।
वरी प्रतिपादी कृष्ण जगजेठी ।
आणि भक्तराजु किरीटी । परिसत असे ॥ ४.२
आता इंद्रियां जाण आहवे ।
तिही श्रवणाचे घर रिघावे ।
मग संवादसुख भोगावे । गीतार्थ हे ॥ ४.३

सर्व इंद्रिये कानाच्या ठिकाणी एकवटून हे विलक्षण तत्त्वज्ञान आपण ऐकावे असे प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊली सांगत आहेत.

(5) आपले सर्वज्ञत्व अर्जुनाला उमगावे म्हणून

भगवंत म्हणतात - पूर्वजन्माचे स्मरण मला आहे पण तुला नाही. त्वंपद आणि तत्पद यात हाच फरक आहे. अर्जुन देहबुद्धीच्या पातळीवरून प्रश्न विचारत आहे. परंतु भगवंत आत्मतत्त्वाला धरून उत्तर देत आहेत. तेत त्वम् आणि प्रत्येकाच्या प्रकृतिधर्मानुसार उपदेश केला जाहिजे अर्जुनाला जे सांगितले तोच आशय उद्धवगीतेत आहे पण सांगायची पद्धत वेगळी आहे.

कथांती - पातंजल योगात म्हटले आहे - जेव्हा योगी अपरिग्रह व्रत आचरतो तेव्हा त्याला मागील सर्व जन्म आणि पुढे जर पुनर्जन्म होणार असतील तर ते सर्व जन्म दिसतात. आणि भगवंत तर योग्याच्याही वरती आहेत. अपरिग्रहाच्या सामर्थ्यामुळे कथंता प्राप्त होते.

(६) मी अजन्मा आहे, अविनाशी आहे तरीसुद्धा प्रकृतीला स्वाधीन करून मी योगमायेने प्रकट होत असतो. या ठिकाणी 'अवतार' व 'सामान्यांचा जन्म' यातील अंतर ध्यानात घ्यावे. स्वेच्छेने जन्म घेणे आणि निसर्गत: जन्म होणे यात फरक आहे. परमात्म्याचे स्वातंत्र्य अबाधित असल्याने जन्म घेणे वा न घेणे त्याच्या स्वाधीन असते. आपला जन्म मात्र आपल्या आधीन नाही.

माया व प्रकृती - माया म्हणजे परमात्म्याची सुप्त ज्ञानशक्ती! परमात्म्याची ज्ञानशक्ती ज्यावेळी कार्यान्वित होते तेव्हा तिला प्र-कृती (प्रकर्षाने क्रियाशीलता) म्हणतात. ईश्वरही स्वत:च्या इच्छेने (मायेने) प्रकृतीच्या

© www.madhavraghuveer.com

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

अंगीकार करतो, म्हणजे सगुण साकार रूप घेतो म्हणजेच जन्मतो।

(6) अवतार - खाली उतरणे (अव + तॄ) परमात्मा म्हणजे विश्वचालक शक्ती! ती आकारात येणे देहात येणे म्हणजेच अवतरण. विश्वशक्ती काही विशिष्ट कार्यासाठी अवतरते, हे कार्य म्हणजे धर्म-संस्थापना. Law is the foundation of the Universe.

धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा.

सारे विश्व ज्या नियमांनी चालते त्या नियमांनाच 'धर्म' म्हणतात. हे धर्म (नियम) कोणीही पूर्णपणे उल्लंघन करू शकत नाही. धर्माला फक्त ग्लानी येऊ शकते. मनुने या विश्व धर्माचा अभ्यास करून समाजरचना केली. म्हणून मनुष्याच्या बांधीव समाजरचनेलाही धर्म म्हणतात. धर्मो धारयते प्रजाः।

समाजरचना मोडून निघणे, विस्कळीत होणे म्हणजे अधर्म माजणे. समाज जीवन अनेक कारणांनी विस्कळीत होते अशा परिस्थितीला गीता 'धर्मग्लानी' म्हणते. समाजपुरुष गोंधळून जातो तेव्हा, नव्या परिस्थितीत समाजबांधणीचे धर्मसंस्थापनेचे कार्य तत्त्वज्ञानाला करावेच लागते पुढेही वेळोवेळी जेव्हा धर्मसंस्थापना करावी लागेल तेव्हा हेच तत्त्वज्ञान नव्या संदर्भात नव्या रूपात अवतरेल जगातल्या त्या त्या

मानवी समाजाला हळूहळू विकासाच्या पायरीवर नेणारे हे तत्त्वज्ञान आहे. जेव्हा जेव्हा अधर्म माजेल तेव्हा तेव्हा मी स्वतःला प्रकट करेन असे भगवंत सांगत आहेत.

(८) आता भगवंत त्यांच्या प्रकट होण्याचे त्रिविध हेतू सांगत आहेत. सज्जनांचे रक्षण, दुष्टांचे निर्दालन आणि धर्माची सुप्रतिष्ठापना करण्यासाठी मी प्रकट होईन. भगवंत सर्वत्र आहे परंतु संत सज्जनांमध्ये तो प्रकर्षाने दिसून येतो.

'जनी जनार्दनी असे परंतु सज्जनी तो वसे ॥

सज्जन हा जनांहून वेगळा असतो. कधीकधी त्यांना भगवान ही संज्ञा लावतात. भगवान व्यास, भगवान शंकराचार्य इ. हे जरी खरे असले तरी ते भगवंत नाहीत कारण ते अशी त्रिविध कामगिरी पार पाडत नाहीत. एकनाथमहाराज म्हणतात

धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।
ते आम्हा येणे घडे । संसारासी ।

भगवंत आणि कारक पुरुष (संत) यात भेद आहे. संतांनी सात्त्विक प्रवाह रूढ केला. भगवंत संतांकरवी सुखाची गुढी उभारतात. पण दुष्टांना मारण्याचे काम भगवंतांना स्वतःलाच करावे लागते. कंस, जरासंध, शिशुपाल, दुर्योधन भगवंतांच्या सान्निध्यात आले पण ते पालटले नाहीत. ते दुर्बुद्ध राहिले. इंद्रियांचे दास बनून राहिले म्हणून त्यांना मारावेच लागले. परंतु संत

© www.madhaveeraghuveer.com

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

दुष्टांचे हनन करीत नाहीत. समाजात सद्विचारांचा प्रसार करतात, लोकांना चांगल्या कार्याकडे वळवतात पण दुष्टांचे निर्दालन करत नाहीत. हा त्यांच्यामध्ये आणि भगवंतामध्ये भेद आहे.

माऊलीने म्हटले आहे - भगवंत विवेकदीपाला आलेली अविचाराची काजळी झाडून तो प्रज्वलित करतात. त्यावेळी योग्यांना निरंतर दिवाळी होते. सर्व जग आत्मसुखाने भरून जाते. फक्त धर्मच जगात नांदू लागतो.

धृ - धारण करणे. जो लोकांना धारण करतो तो धर्म किंवा जो पुण्यात्मा पुरुषाकडून धारण केला जातो तो 'धर्म'. मनुने दशलक्षणी, तर याज्ञवल्क्याने नवलक्षणी धर्म सांगितला आहे. मानवता आणि सदाचार हाच धर्माचा गाभा आहे आणि सत्य व आत्मौपम्य दृष्टी हीच धर्माची मुख्य तत्त्वे आहेत.

थोडक्यात व्यष्टी, समष्टी आणि परमेष्टी यांचा परस्परानुबंध योग्य रहावा यासाठी आणि मानवाचे ऐहिक आणि पारलौकिक कल्याण व्हावे यासाठी मानवाला जो प्रेरणा देतो व मार्गदर्शन करतो तो 'धर्म' होय. सदाचार व नीती यावरच तो आधारित असतो.

9.00 (९) माझा जन्म त्याप्रमाणे अलौकिक दिव्य आहे, तशीच माझी कर्मे दिव्य आहेत असे जो तत्त्वतः जाणतो
10.00 तो शरीराचा त्याग केल्यानंतरसुद्धा पुनर्जन्माला येत नाही तो मलाच येऊन मिळतो दिवस -
11.00 दिन - स्वर्ग - स्वर्गीय, अलौकिक - भगवान श्रीकृष्णाने बालपणीच पूतना राक्षसीला मारले हे सामान्य कर्म
12.00 नव्हे. हे अलौकिक कर्म आहे. यमुना पार करताना टोपलीतील बाळाला अगाध पाण्याला लागला आणि
1.00 खळाळणारी यमुना शांत होऊन वाट निर्माण झाली. हे साधारण कर्म आहे काय? हे तर दिव्य कर्म आहे
2.00 (१०) वीतरागभयक्रोधा - [illegible] या [illegible]
वीत म्हणजे गेलेले नष्ट झालेले. ज्यांचे राग, भीती
3.00 आणि क्रोध नष्ट झालेले आहेत असे पुष्कळ लोक आहेत - जे माझ्या ठायी अनन्य प्रेमपूर्वक राहणारे, माझाच
4.00 आश्रय घेणारे पुष्कळ भक्त ज्ञानरूप तपाने पवित्र होऊन माझ्या स्वरूपाला प्राप्त झाले आहेत
5.00 धर्म हा धर्मी आहे तर सदाचरण नीती ही त्याची धुरी आहे. धर्म जिथे असेल तिथे नीती
6.00 ही असणारच असते.

Sunday 31

या श्लोकामध्ये संसाराशी 'स्व'चा संबंध
7.00 विच्छेद आहे आणि मन्मया मामुपाश्रिताः मध्ये भगवंताविषयी तल्लीनता आहे. कोणाचा ना कोणाचा
8.00 आश्रय घेतल्याशिवाय मनुष्य राहू शकत नाही येथे आकर्षणही भगवंत आणि आश्रयही भगवंताचा आहेत

सद्वस्तुस लाभे सद्वस्तु। अस्नाध्येस्तास अस्नाध्येस्तु
याह्ना प्रशस्तास प्रशस्तु। विचार लाभे॥ ६.९.२१॥



| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

(६९) भाव तैसा देव - भक्त मला जसे भजतात तसा मी त्यांना पावतो. तुम्ही जर क्षुद्र फलाची आशा ठेवून भगवंताला शरण गेला तर तो तेवढेच फळ तुम्हाला देईल. जो जेवढे मागतो तेवढे त्याला देणे हे भगवंताला सोपे वाटते पण जो काहीच मागत नाही त्याला काय द्यायचे हा कधी कधी परमेश्वराला सुद्धा प्रश्न पडतो. 'न मागे तयाची रमा होय दासी' भक्त भगवंताविना व्याकुळ होतो त्याप्रमाणे भगवंतही भक्ताशिवाय व्याकुळ होतो. त्याला एकट्याला करमत नाही. बृहदारण्यकात म्हटले आहे - एकाकी न रमते। तेव्हा भगवंतच अनेक रुपाने प्रकट होऊन खेळ खेळू लागले, लीला करू लागले. या श्लोकात यथा - तथा हे संबंध आणि भाव दाखवण्यासाठी वापरले आहे. भक्त आणि भगवंतात मोठा फरक हा की भगवान भक्ताच्या इच्छेनुसार वर्तन करत नाहीत, तर आपल्या पद्धतीनुसार करतात. भगवान सर्वत्र विद्यमान, सर्वसमर्थ, सर्वज्ञ, परम सुहृद आणि सत्यसंकल्प आहेत.

दरिया दूबा रालमें, नहीं राममें दोष।
जन चाले इक पॉंवडो, हरि चाले सौ कोस॥

भक्ताने आपले सर्वस्व जर भगवंताला समर्पित केले तर भगवंतही त्याला पूर्ण शक्तीने प्राप्त होतात. खरं तर किती सरळ आणि स्वस्त सौदा आहे. परंतु त्यात संपूर्ण शरणागती पाहिजे प्रपद्यते म्हणजे प्रपत्ती म्हणजेच संपूर्ण शरणागती समजून

Ascending efforts of man
Descending Grace of God

© www.madhaveeraghuveer.com

मूर्तीमध्ये जेव्हा भाव येतो तेव्हा त्याला ब्रह्मांडाचे मोल येते म्हणून भाव महत्वाचा। चलनी नोट म्हणजे कागदाचा तुकडा परंतु त्यावरच्या शिक्क्यामुळे त्याला किंमत येते. त्या कागदाचे काही विशेष मोल नसते

म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात –

केला मातीचा पशुपती। परि मातीसी काय म्हणती।
शिवपूजा शिवासी पावे। माती मातीमाजी सामावे॥
केला पाषाणाचा विष्णु। परि पाषाण नव्हे विष्णु।
विष्णुपूजा विष्णुसी अर्पे। पाषाण राहे पाषाणरूपे॥

माती, पाषाण, धातु हे शेवटी बाजूलाच राहणार खरी पूजा शिवाला, विष्णुला, जगदंबेलाच पोचणार. सर्वस्व समर्पण म्हणजे फळ, भाव आणि भार समर्पण करणे. माणसे भार समर्पण करतात आणि फळ मला दे असे म्हणतात. पण ईश्वराला तुम्ही फसवू नाही शकत. ईश्वरप्राप्तीसाठी जसा भाव आवश्यक आहे तसे ज्ञानही आवश्यक आहे. या अध्यायात ज्ञानाचे महत्व सांगितले आहे. भक्ती असो अथवा ध्यान त्या सर्वांना ज्ञानाची बैठक हवी. आपला भाव सात्विक करूनच ईश्वरोपासना करावी. सत्वयुक्त मानव चित्तशुद्धीमुळे क्रमश: ज्ञानाकडे जातो भगवंताचे यथा-तथा हे केवळ क्रियेत आहे भावामध्ये नाही. भगवंतांना जसा आस्तिक व्यक्तीविषयी स्नेह आहे, तसा नास्तिक व्यक्ती विषयी सुद्धा आहे.

(३२) ज्ञानाचे जर इतके महत्व आहे. ज्ञानाने जर मोक्षप्राप्ती होत असेल तर सर्वजण ज्ञानयुक्त होऊन आराधना का करत नाही? याचे उत्तर देताना भगवंत म्हणतात –

© www.madhavveeraghuveer.com

जैसे क्षेत्री जे पेरिजे। ते मागुति आन न निपजे॥
जे पेरावे त्यावाचून दुसरे काहीच उगवणार नाही.
कारल्याचे बी लावून आंबे नाही मिळणार. हे
लोकांना कळते पण वळत नाही. आणि सकामवृत्तीचे
फळ तात्काळ मिळत असल्याने माणसे त्यामागेच
असतात. माणसाची स्वाभाविक वृत्ती अशी आहे
की त्याला कमी कष्टात फळ हवे असते.
सर्वांना Short Cut आवडतो. म्हणून माणसे
देवतापूजन करतात. भगवंत पित्याप्रमाणे तर
देव दुकानदाराप्रमाणे आहेत. हानिकारक गोष्टी जर
मुलाने मागितल्या तरी पिता त्याला देणार नाही,
पण दुकानदार मात्र देईल. उपासक भिन्न भिन्न
प्रकृती, प्रवृत्तीचे असतात. त्यांच्या उपासनेप्रमाणे
त्यांना तसतसे फळ मिळते. त्यांच्यामध्ये असलेल्या
तीन गुणांमध्ये ज्या गुणाचे प्राबल्य असेल त्याप्रमाणे
मानवी जीवनाची दिशा ठरते.

(53) चातुर्वर्ण्यम् - माणसाप्रमाणेच पशु, पक्षी, वनस्पती
यामध्ये ही पद्धत आहे. कबूतर, सारस, घार,
कावळा हे पक्ष्यांमध्ये तर पिंपळ, कडुनिंब, चिंच
बाभूळ असे चार वर्ण वनस्पतींमध्ये आहेत. समाजाला
काही शिस्त हवी. प्रत्येकाचा स्वभाव, गुणधर्म, पात्रता
यानुसार कामाची विभागणी केली आहे. समाजात
विषमता अपरिहार्य आहे. त्या विषमतेचे योग्य
नियोजन केले तर समाज सुखाने नांदू शकतो.
आणि वर्ण म्हणजे जात नव्हे तर वर्ण म्हणजे व्यवसाय)

सदाचरणात रहा - ४ प्रकारे अर्थ.

© www.madhaveeraghuveer.com

पूर्वी बहुसंख्य ठिकाणी चारही वर्ण आनंदाने नांदत होते. परकीय आक्रमणानंतर समाजधारणेमध्ये विकृती आली. खरं तर या सृष्टीमध्ये वैविध्य आहे पण विरोधाभास आही. किंवा विकारही नाहीत. समता कशात आहे? तर गुणाप्रमाणे प्रत्येकाची योग्यता क्षमता जाणून ओळखून त्याला रुचेल भावेल असे काम त्याला मिळणे ही समता. त्यानुसार त्याची उपजीविका होणार असते अज्ञानजन्य निरहंकारापासून ज्ञानजन्य निरहंकारापर्यंत चढती श्रेणी आहे.

वाघ, सिंह पशु, पक्षी - अज्ञानजन्य निरहंकार
सर्वसामान्य माणूस - व्यक्तीगत अहंकार
सात्त्विक मनुष्य - व्यापक अहंकार
ज्ञानी मानव - ज्ञानजन्य निरहंकार

भगवंत सर्व करून अकर्ता आहेत. कारण कर्तृत्वाचा कोणताही अहंकार त्यांच्या ठिकाणी नाही. ते अव्यय आणि अकर्ता कसे हे पुढील श्लोकात सांगितले आहे

(१४) कर्मे करूनही भगवंत अलिप्त आहेत

अहंता आणि ममता हे मुख्य दोष आहेत. पण ते जीवाला असतात, देहाला असतात. परमात्म्याला ते नसतात. परब्रह्म सदैव निर्लेप, सर्वमय आणि एकदेशी, एकरस असते आणि हे जो जाणतो तोही हळूहळू निर्लेप होण्याचाच प्रयत्न करणार हे उघड आहे. निर्लेप झाला की कर्मबंधन तुटणार अर्थात जीवात्मा परमात्मा एक होणार.

© www.madhaveeraghuveer.com

05 June Friday
Week 23
156-209

2009

| May | | | | | | June | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 | Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 | Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 | Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 | Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 | Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 | Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

म्हणजेच प्रयत्नाने, अभ्यासाने हे सर्वांना शक्य आहे. भगवंताची कर्मे दिव्य आहेत त्याप्रमाणे संत महात्म्यांची कर्मेही दिव्य होतात. कर्मातील मलिनता नाहीशी झाल्यामुळे ती कर्मे कर्त्याला व इतरांनासुद्धा (त्याप्रमाणे आचरण केल्यावर) मुक्त करणारी ठरतात. हे अधिक स्पष्ट करताना भगवंत म्हणतात —

(१५) वैवस्वत, मनु, जनक, यदु इ० थोरांनी निष्काम कर्मयोग आचरला. त्यामुळे त्यांना कर्मबंधन पडले नाही. त्याप्रमाणे अर्जुनाने जर कर्तव्यभावनेने क्षात्रधर्म आचरला तर त्याला कर्मबंधन पडणार नाही आणि पापही लागणार नाही. हा कर्मयोग अनेक मुमुक्षु आणि सिद्धांनी आचरला आहे हे जरी खरे असले तरी कर्माचे यथार्थ रूप जाणून घेणे सदैव कठीणच आहे म्हणून भगवंत सांगतात.

(१६) प्रदर्शनाकडून आत्मदर्शनाकडे जा.
येथे कवि म्हणजे द्रष्टे, विद्वान याअर्थी म्हटले आहे. कर्म काय, अकर्म काय याविषयी विद्वान सुद्धा मोहित झाले आहेत. पण तेच कर्म म्हणजे काय हे मी तुला चांगल्या रीतीने सांगेन की त्यामुळे तू अशुभापासून मुक्त होशील. प्रथम शास्त्रप्रचीती, गुरुप्रचीती, आत्मप्रचीती या तीन पायऱ्यांवरूनच जावे लागते. गुरु जिथल्या तिथे म्हणजे स्व-रूपामध्ये तुम्हाला नेऊन घालत असतो.

© www.madhaveeraghuveer.com

म्हणून गुरुकडून स्वकर्म समजावून घ्यावे इथे अर्जुन तेच करत आहे त्यासाठी भगवंत कर्म या संज्ञेचा अधिक विस्तार पुढील श्लोकात सांगत आहेत.

(१७) बोद्धव्यम - जाणून घेण्यासारखे
कर्म - विहित कर्म
विकर्म - निषिद्ध कर्म
अकर्म - देहाहंकार नसलेले निस्वार्थ कर्म.

कर्माचे, विकर्माचे आणि अकर्माचे स्वरूप जाणून घ्यावे कारण कर्माची गती गहन आहे. आता हे जो जाणून घेतो म्हणजे हा बोध ज्याला होतो तो बुद्धिवान! हा बुद्धिवान कसा ओळखावा?

(१८) जो अकर्मात कर्म आणि कर्मात अकर्म पहातो तोच खरा योगी, बुद्धिवान! म्हणजे कसे?

कर्ता जरी अनासक्त असला तरी देह आहे तोवर स्वधर्म आचरलाच पाहिजे म्हणजे अकर्मात कर्म दिसले पाहिजे. आई मुलाला वाढवताना निरपेक्ष असते पण स्वकर्तव्याला विसरत नाही.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -



जैसा को जळापाशी उभा ठाके।
तो जरी आपणपे जळामाजि देखे।
तरी तो निभ्रांत ओळखे।
म्हणे मी वेगळा आहे॥

तो सर्व कर्माचरण करत असतो. पण ते कर्माचरण आभासात्मक आहे असे मानून आपण कर्मरहित

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

आहेत हे तो जाणतो. सर्व सृष्टी नाशिवंत असून देहही नाशिवंत आहे अविनाशी केवळ आत्माच आहे हे जो जाणतो तो भोक्तृत्व आणि कर्तृत्व या दोन्हींपासून अलिप्त असतो म्हणून त्याच्या कर्मातही अकर्म असते तो व्यक्तिगत लाभासाठी काही करत नाही. लोक-संग्रहासाठी आणि आत्मकल्याणाचा मार्ग दाखवण्यासाठी त्याची कर्मे असतात. त्यामुळे अकर्मातही त्याची कर्मे चालूच असतात.

आत्मज्ञानी - जो लोककल्याणासाठी चंदनासारखा झिजतो तोच खरा योगी, तोच खरा बुद्धिमान!

१८) अशा बुद्धिमान योग्याचे महत्त्वाचे लक्षण कोणते? तर कर्माचा तिरस्कारही नाही आणि कर्मफलाची आशाही नाही असे अद्भुत कर्म निष्काम कर्मयोगी आचरतो. प्राकृत जनांची काही कर्मे शुक्ल (शुभ) तर काही कृष्ण (अशुभ) असतात तर काही कर्मे शुक्ल-कृष्ण (शुभाशुभ) अशी असतात परंतु योगारूढ पुरुषाची कर्मे अशुक्लाकृष्ण असतात. शुभही नाहीत अशुभही नाहीत अशी निर्लेप असतात त्यामुळे याच देहानंतर त्यांचे जन्ममरणस्वरूप संसारचक्र समाप्त होते.

शुभ कार्य कसे ओळखावे?
जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे।
जनी वंद्य ते सर्व भावे करावे॥

असे जरी समर्थांनी टोकाचे मानाने सांगितले असले तरी तो मार्ग नेहमीच उपयोगी पडेल असे नाही. कारण समाज अवनतीला गेल्यावर नैतिक मूल्यांचाही ऱ्हास होतो आणि चांगल्या वाईट गोष्टींचा विवेक करता येत नाही. अनेक सत्प्रवृत्त लोकांना शुभ कर्मच हातून घडावे असे वाटत असते तरीसुद्धा शुभाशुभ कर्मांचा विवेक न झाल्याने अशुभ कर्मे हातून घडतात. मनुस्मृतीत सांगितलेल्या कसोटीनुसार, जे कर्म करीत असताना किंवा केल्यावर जनाची किंवा मनाची लाज वाटते ते कर्म वाईट. त्यातही जनलज्जेपेक्षा मनाच्या कौलाला अधिक मान द्यावा!

प्रत्येकाच्या हृदयात ईश्वराचा वास असतो आणि तो सत्प्रेरणा देत असतो. परंतु दुष्टाला पापेही न्याय्यच वाटतात. जे कर्म केल्यावर मनाला टोचणी लागून राहील अशा कर्मांपासून आरंभीच निवृत्त व्हावे. शुभाशुभ कर्मे मनाच्या कसोटीवर पारखण्याचा अभ्यास जितका अधिक होईल तितकी अंतःकरणातील सत्प्रेरणा अधिक सुस्पष्ट व शुद्ध स्वरूपात होऊ लागते. व अशा व्यक्तीला उत्तरोत्तर श्रेष्ठ जन्म मिळून अंती तो कैवल्यावस्थेला पोहोचतो. अशा ज्ञान्याचा कर्मभोग सरतो त्याची कर्मे दग्ध होतात. मागील पातकांचा नाश होतो. त्याला ज्ञानी लोकही पंडित म्हणू लागतात. असा हा ज्ञानी पंडित आपली कर्मे लोकसंग्रहार्थ करतो —

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

नित्यानित्य विवेक जो धारण करतो त्याच्या बुद्धीला पण्डा बुद्धी असे म्हणतात आणि अशी पण्डा बुद्धी ज्याची आहे तो पंडित.

(२०) असा हा ज्ञानी पंडित निःसंग, निस्पृह व निराश्रय असतो. बाह्य संग म्हणजे बांधव, मित्र, पत्नी, पुत्र, आप्तेष्ट इ. आणि अंतःसंग म्हणजे पंच तन्मात्रांचे विषय! अगदी दया, क्षमा, शांती सुद्धा नको असे निक्षेवाराय म्हणावे होते — <u>निःसंग.</u>

तेव्हा हे दोन्ही संग टाकायचे. कर्म न टाकता कर्मफल टाकायचे हे फार कठीण आहे. खरा आत्मज्ञानी <u>नित्यतृप्त</u> असतो. त्याच्या चित्तात यत्किंचितही लोभ नसतो. <u>निराश्रय</u> - देश, काल, वस्तू, व्यक्ती, परिस्थिती इ.चा जो थोडाही आश्रय घेत नाही तो निराश्रयता म्हणजे अनासक्ती. दृष्ट वा अदृष्ट फलाविषयी जो संपूर्णपणे अलिप्त व अनासक्त असतो त्याला निराश्रय म्हणतात. कोणत्याही प्रापंचिक गोष्टीवाचून त्याचे काहीही अडत नाही.

त्याचे प्रत्येक कर्म निरभिमानता व फलासक्ती-शून्यता यावरच आधारलेले असते. तो शरीराविषयी उदास असतो. फळाच्या उपभोगाविषयी निरिच्छ असतो व नेहमी आनंदतृप्त असतो. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात - असा ज्ञानी पुरुष संतोषाच्या गाभाऱ्यात जेवीत असताना आत्मबोधाच्या पक्वान्नाला 'पुरे' असे कधीही म्हणत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

(२१) कर्मयोग्याची तीन प्रधान लक्षणे —
निराशी, यतचित्तात्मा, त्यक्तसर्वपरिग्रहः

निराशी - ज्याने सर्व आशापाश तोडून टाकले आहेत असा. निराशी होण्यासाठी स्वार्थत्यागी व्हावे लागते. निराशी होण्यासाठी मानवाने प्रत्येक कर्म हे शास्त्राने संमत केलेले आहे तेच व्हावे (पुण्यकर्म) त्याविरुद्ध कधीही कर्म करू नये.

यतचित्तात्मा - ज्याने चित्तशुद्धी करून मन जिंकले असा. चित्तशुद्धीमुळे ममता व आसक्ती कमी होते व परमानंदाची रुची वाढते.

त्यक्तसर्वपरिग्रहः - ज्याला अनासक्त कर्मयोग समजला तो अनावश्यक संग्रह करतच नाही. आणि संग्रह असला तरी तो जनसामान्यांसाठी खर्च करण्यात महात्म्याला निरपेक्ष आनंदच होतो.

एकनाथ महाराजांचे उदाहरण - घरी आलेल्या यात्रेकरूंच्या भोजनसिद्धीसाठी सरपण नव्हते तेव्हा नक्षीदार लाकडी मंचक सरपण म्हणून वापरला.

असा महात्मा शरीराच्या माध्यमातून कर्मे करतो ती केवळ निःस्पृहपणे! अशा आशारहित पुरुषाला कर्मे कधीही बाधत नाहीत.

(२२) सर्व सृष्टी द्वंद्वात्मक आहे. त्यामुळे अनुकूल - प्रतिकूल वाट्याला येतेच. परंतु दोन्ही मध्ये समान राहून ते ते स्वीकारणे म्हणजे द्वंद्व पचविणे. असे जो करतो तोच खरा समदर्शी होय.

© www.madhaveeraghuveer.com

यदृच्छालाभ - कोणतीही याचना, प्रार्थना न करता जी वस्तू प्राप्त होते तिला यदृच्छालाभ असे म्हणतात. 'ठेविले अनंते तैसेची रहावे' असे तुकाराम महाराज म्हणतात. कंक्षातीतता हेच संतोषाचे अधिष्ठान.

लोकमान्य टिळकांच्या ठिकाणी चित्ताची अद्भुत स्थिरता होती. ते म्हणत - तुरुंग म्हणजे माझी विश्रांती आहे. इथे राहून मला अनेक कामे करता येतात.

विमत्सर: - निर्मत्सरता, निर्वैर बुद्धी. ज्याचे आचरण व्यापक व धर्माधिष्ठित असते तो व्यक्तिगत वैर, मत्सर, द्वेष यांच्या पलीकडे गेलेला असतो. धीरांचे आचरण तत्त्वनिष्ठ असते व्यक्तिनिष्ठ नाही. कर्माची सिद्धी / असिद्धी ही ईश्वरावर सोपवावी.

सिद्ध्यसिद्ध्यो: समो भूत्वा
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकार:

इथे बाजीप्रभू देशपांडे यांच्या वीरवृत्तीची आठवण होते. पावनखिंड लढवताना प्रखर अशी कर्तव्य-भावना त्यांच्या चित्तात होती. या लढाईत महाराजांना जय मिळेल किंवा नाही तसेच मला या लढाईमुळे काय लाभ होईल, कोणते पद मिळेल हा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. सिद्धी अथवा असिद्धी यामध्ये समभाव याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

© www.madhaveelaghuveel.com

अंतो कर्तेरे 9261082006



श्लोक १८ ते २२ यामध्ये सांगितलेली
निष्काम कर्मयोग्याची श्रेष्ठ लक्षणे —

१. या महात्म्याची सर्व कर्मे कामनारहित व संकल्परहित असतात
२. आत्मज्ञान झाल्यामुळे त्याची कर्मे (संचीत व प्रारब्ध) जळून जातात
३. असा महात्मा नित्यानित्यविवेक करणारी पण्डा बुद्धी धारण करतो
४. कर्माचे फळ व कर्मसंग यांचा त्यांनी त्याग केलेला असतो.
५. कर्तृत्वाभिमान आणि फलासक्ती गेल्यामुळे तो नित्यतृप्त झालेला असतो.
६. दृष्ट अदृष्टाची त्याची आसक्ती सरल्यामुळे तो निराश्रय असतो.
७. तो निराशी (अनासक्त, अलिप्त) असतो.
८. तो यतचित्तात्मा (ज्याने शरीर, अंतःकरण वश केले आहे असा) असतो.
९. त्यामुळे इंद्रियांचे भोग प्राप्त होतील अशा संग्रहाचा तो त्याग करतो.

Sunday 14

१०. पुरुषार्थ गाजवल्यानंतर जे प्राप्त होईल त्यात हा महात्मा संतुष्ट असतो
११. तो द्वंद्वातीत असतो.
१२. त्याच्या ठायी निर्वैरबुद्धी अर्थात समत्वरूप योग असतो.
१३. सिद्धी व असिद्धी यात समाधान ठेवून तो

© www.madhaveeraghuveer.com

May

| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

June

| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

निष्काम कर्मयोग आचरतो.

५४. त्याचा अंतर्बाह्य संग गेल्याने तो आसक्तीहीन झालेला असतो.

५५. त्याचे चित्त ज्ञानात मुरलेले असते.

५६. त्याचे प्रत्येक कर्म यज्ञरूपच असते.

तात्पर्य - असा महापुरुष मुक्तच असतो. परमात्मा व आत्मा यांच्या एकतेचा, अद्वैताचा प्रत्यक्ष बोध म्हणजे ज्ञान होय. अशा अद्वैताचा प्रत्यक्ष अनुभव ज्याला आला तो ज्ञानावस्थितचेतसः होय. वैदिक कालखंडापासून विवेकानंद, योगी अरविंद यांच्यापर्यंत अनेकांनी निष्काम कर्मयोगाचा आदर्श जनसामान्यांना घालून दिला.

आत्मज्ञान व श्रेष्ठता वयावर किंवा रूपावर अवलंबून नसते तर आत्म्यावर असलेल्या विश्वासाने, श्रद्धेने तसेच अभ्यास आणि सातत्याने आत्मज्ञान व श्रेष्ठता प्राप्त करून घेता येते.

(२४) अतिशय सुंदर आशय असलेला हा श्लोक आहे. मनुष्याचे प्रत्येक कर्म हे ब्रह्मस्वरूपच असते. अर्पण म्हणजे स्रुव, स्रुवादिक म्हणजे तूप वगैरे द्रव्ये ज्या काष्ठ पात्रांनी अर्पण करतात ते.

इथे यजमान, अध्वर्यु, यज्ञसाधने इ. सर्व ब्रह्ममयच झाले आहे. अर्पण करणारा, अर्पण करायचे ते, अर्पण केलेले होमणारा, फल जाणणारा सर्व ब्रह्मच होय.

©www.madhaveeraghuveer.com

यज्ञाचे दोन प्रकार – द्रव्ययज्ञ – मंडप वगैरे उभारून
द्रव्याच्या बळावर जो केला जातो तो द्रव्ययज्ञ
यात कर्तृत्वाचा अहंकार असतो आणि स्वर्गादि
लोकांची प्राप्ती व्हावी अशी फलाकांक्षाही असते
हाच द्रव्ययज्ञ ईश्वरार्पण बुद्धीने अनुष्ठित केला
फलाकांक्षाविरहित केला चित्तशुद्धीने पावन केला
तर तोच द्रव्ययज्ञ क्रमाने ज्ञानयज्ञ होऊ शकतो
तो साधनविरहितही असू शकतो. वरील श्लोकात
सांगितलेला ज्ञानयज्ञच आहे.

(२४) २४ ते ३० या श्लोकांमध्ये भिन्न भिन्न
प्रकारचे यज्ञ वर्णन केले आहेत.
अर्पण – ज्या पात्राने अग्नीमध्ये आहुती दिली जाते
त्या स्रुक् स्रुवादिकांना अर्पण असे म्हटले जाते.
अर्प्यते अनेन इति अर्पणम् ।
हव्य पदार्थ – तीळ, जव, तूप इ०
यज्ञ करणाराही ब्रह्म आणि अग्निही ब्रह्मच!
हा श्लोक जाणकार लोक भोजनाच्या वेळी
म्हणतात त्यामुळे भोजनरूपी कर्मसुद्धा ब्रह्मरूप
होऊन जाते
सर्वं खल्विदं ब्रह्म (छांदोग्य)

(२५) अपरे वेगळ्या प्रकारचे यज्ञ करणारे

(२६) श्रोत्रादि – पंच ज्ञानेंद्रिये
शब्दादि – शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध हे पाच विषय
इंद्रिये संयमरूपी अग्नीत होऊन जावीत. इंद्रियात कोणतेही
विकार उत्पन्न होऊ नयेत. आसक्तीचा पूर्णपणे अभाव

© www.madhaveeraghuveer.com

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

असताना एकांतवासात इंद्रियांचा संयम चांगल्या रीतीने होऊ लागतो. पूर्ण संयम झाल्यानंतर एकांतवास आणि व्यवहार या दोन्हीत त्याची समान स्थिती रहाते

(२५) या श्लोकात समाधिला यज्ञाचे स्वरूप दिले आहे. समाधिमध्ये दहाही इंद्रियांच्या क्रियांचे हवन करीत असतात. समाधिमध्ये ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांच्या क्रिया थांबतात. इंद्रिये निश्चल आणि शांत होतात. यामध्ये प्राणांचीही क्रिया थांबते. समाधिमध्ये प्राणांची गती रोखली जाते. ही गती रोखण्याची क्रिया काही तासांपासून ते काही दिवसांपर्यंत सुद्धा असू शकते. कुंभकाच्या अभ्यासाने ही गती रोखता येते. पावसाळा संपल्यावर वाळू कोरडी होते तेव्हा बेडूक त्या वाळूमध्ये सुकल्यासारखा पडून रहातो. जणू त्याचे प्राण थांबतात पुन्हा पाऊस पडल्यानंतर त्याच्यात प्राणांचा संचार होतो व तो ओरडू लागतो. मन संपूर्ण एकाग्र केल्यावर प्राणांची गती आपोआप संथ होते आणि हळूहळू थांबते.

ज्ञानदीपिके - समाधि आणि निद्रा दोन्ही भिन्न आहेत. बाहेरून समान दिसत असले तरीही समाधीत एक सच्चिदानंद परमात्माच सर्वत्र परिपूर्ण आहे असे ज्ञान जागरूक असते. परंतु निद्राकाळात वृत्ती अविद्येत लीन होते परंतु प्राणांची गती चालूच असते. ∴ निद्रा आल्याने समाधि लागत नाही.

समाधिरूपी यज्ञ करणारे योगी इंद्रिये आणि

© www.madhavveeraghuveer.com

प्राणांच्या क्रियांचे समाधिरूपी अग्निमध्ये हवन करतात त्यामुळे इंद्रिये आणि प्राण आपली चंचलता सोडून देतात

(२८) यतय: - प्रयत्नशील साधक
संशितव्रता: - तीक्ष्ण व्रत करणारे
यम - ५ प्रकारचे अहिंसा, सत्य, अस्तेय
ब्रह्मचर्य, अपरिग्रह

द्रव्ययज्ञ - विहिर, तलाव, मंदिर धर्मशाळा बांधणे, दान करणे. द्रव्याला आपले आणि आपल्यासाठी न मानता निस्वार्थ भावनेने समाजाचे मानून ते द्रव्य त्याच्या सेवेमध्ये लावल्याने द्रव्ययज्ञ सिद्ध होतो. शरीरादि जेवढ्या वस्तु आपल्याकडे आहेत त्याने हा द्रव्ययज्ञ होऊ शकतो.

तपोयज्ञ - आपल्या स्वधर्मपालनात ज्या काही अडचणी प्रतिकूलता येतील त्यांना प्रसन्नतापूर्वक सहन करणे हा तपोयज्ञ आहे लोकहितार्थ उपवास करणे, मौन धरणे हाही तपोयज्ञच आहे.

प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा आपल्या कर्तव्यापासून थोडेही विचलित न होता काम करीत रहाणे ही फार मोठी तपश्चर्या आहे. ती शीघ्र सिद्धी देणारी आहे. गावातील घाण, कचरा वाईट दिसतो परंतु तेच जर शेतात खत म्हणून वापरले तर त्यापासून उत्तम पीक मिळते.

प्रतिकूलतेला अनुकूलतेत बदलणे म्हणजे तपोयज्ञ आहे.

© www.madhaveeraghuveer.com

# 19 June Friday

Week 25
170-195

2009

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

9.00 योगयज्ञ - अंतःकरणाच्या समतेला योग म्हटले आहे.
मनात चलबिचल, राग द्वेष, हर्ष-शोक, सुख-दुःख
10.00 न होणे म्हणजेच सम रहाणे हा योगयज्ञच आहे.
कार्याची पूर्ती किंवा अपूर्ती सम मानणे हा
11.00 योगयज्ञच आहे.

स्वाध्यायज्ञानयज्ञ - केवळ लोकहितासाठी गीता
12.00 रामायण, भागवत, वेद, उपनिषद इ० चे
यथाधिकार मनन विचारपूर्वक पठन-पाठन करणे
1.00 जीवनाचे अध्ययन करणे इ० सर्व ज्ञानयज्ञच आहे.
गीतेचा स्वाध्याय हा ज्ञानयज्ञच आहे.
2.00 अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः। १८.७०
3.00 या श्लोकातही श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या
धर्ममय संवादाला ज्ञानयज्ञाची उपमा दिली आहे.
4.00 (२९) (३०) प्राणाचे स्थान हृदय
अपानाचे स्थान गुद
5.00 पूरक कुंभक रेचक
४ १६ ८
6.00 याचा अभ्यास वारंवार करणे म्हणजे प्राणायाम
रूपी यज्ञच आहे. परमात्मप्राप्तीच्या उद्देशाने
7.00 निष्कामभावनेने प्राणायामपरायण झाल्यास
सर्व पापे नष्ट होतात.
8.00 नियमित आहार विहार करणारा साधक प्राणांचे
प्राणात हवन करू शकतो. म्हणजे प्राण आणि
अपानाला आपापल्या स्थानावर रोखू शकतो.

श्वास बाहेर येऊ द्यायचा नाही आणि आतही जाऊ द्यायचा नाही म्हणजे स्तम्भवृत्ती प्राणायाम.

याने वृत्ती स्वाभाविकरीत्या शांत होतात. अंतःकरण शुद्ध होते आणि परमात्मप्राप्ती होते.

सर्वेऽप्येते - म्हणजे हे सर्व यज्ञ - त्यांचे अनुष्ठान केल्याने सर्व पापे नष्ट होतात अविनाशी परमेश्वराची प्राप्ती होते. परंतु जे लोक मनात कामना ठेवून यज्ञ करतात त्यांना परिश्रम करून सुद्धा जन्म मरणाचे बंधन कायम रहाते.

गतागतं कामकामा लभन्ते। ९.२१

आहुती दिलेल्या गोष्टीचे वेगळे अस्तित्व रहायला नको. सर्व स्वाहा व्हायला हवे. लोकहितासाठी केलेली सर्व कर्मे स्वाहा होतात.

यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते। ४.२३

(३१) यज्ञ न केल्यास हा लोकही लाभदायक होणार नाही तर परलोकाचे काय?

यज्ञातून शेष राहिलेल्या अमृताचे सेवन करणारे सनातन परमात्म्याला प्राप्त होतात. परंतु यज्ञ न करणाऱ्यांना या लोकातही आणि

Sunday 21

परलोकातही सुख लाभणार नाही.

घरातील एखादी स्वार्थी आप्पलपोटी व्यक्ती इतरांना नकोशी होते. स्वार्थाचा संपूर्णपणे त्याग करून कर्तव्य करून सर्वांना सुख पोहोचविणे ही घरामध्ये अथवा संसारामध्ये राहण्याची विद्या आहे आपल्या कर्तव्याचे पालन केल्याने दुसऱ्यांनाही कर्तव्य-

© www.madhavveeraghuveer.com

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

पालनाची प्रेरणा मिळते आणि घरामध्ये ऐक्य व शांती स्वाभाविकपणे नांदते. परंतु यज्ञ न करणाऱ्याला म्हणजे कर्तव्यपालन न करणाऱ्याला हा लोक आणि परलोकही दुःखदायक होतो.

(३२) अशा प्रकारचे अजूनही पुष्कळ यज्ञ वेदांच्या वाणीत विस्तारपणे सांगितले आहेत. त्या सर्वांना तू कर्मजन्य आहेत असे जाण आणि असे जाणून यज्ञ केल्यास तू कर्मबंधनातून मुक्त होशील. २४ ते ३० या श्लोकांमध्ये १२ यज्ञांचे वर्णन केले आहे.

वेदात सकाम अनुष्ठानांचेही वर्णन केलेले आहे. त्यातून नश्वर फलांचीच प्राप्ती होते. अविनाशी फलाची नव्हे. सकाम अनुष्ठाने करणारा व्यक्ती स्वर्गाला जातात परंतु पुण्य संपल्यानंतर पुन्हा मृत्युलोकात जन्म घेतात.

येथे मात्र निष्काम यज्ञाविषयी सांगितले आहे. याति ब्रह्म सनातनम्।
नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।

यज्ञामध्ये परमात्मा नित्य विराजमान असतो. यामुळे त्याच्या अनुष्ठानाने परमात्म्याची प्राप्ती होते.

संसारात अनेक क्रिया घडत असतात. परंतु त्या क्रियेशी मनुष्य आपला संबंध जोडतो, त्यानेच तो बांधला जातो.

या सृष्टीत सूर्य, वरुण, अग्नी, पर्जन्य, नद्या, पर्वत, वृक्ष इ. अनेक शक्ती अस्तित्वात आहेत. वास्तविक तेच देव आहेत. Mighty forces. त्यांचा आदर करावा. त्यांना वंदन करावे. निसर्गावर विजय मिळवण्याचे दुःसाहस माणसाने करू नये. उलट निसर्गनियमांना अनुसरून जीवन व्यतीत करावे.

© www.madhaveeraghulveer.com

हे सर्व वर्णन वाचून या यज्ञांपैकी कोणता यज्ञ श्रेष्ठ आहे? असा प्रश्न पडतो तर द्रव्ययज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे.

यज्ञ हा शब्द यज् धातुपासून आला आहे. सन्मान, [illegible] आणि दान या तीन तत्त्वांनी युक्त असे हे यज्ञकर्म आहे. स्वतःविषयीच्या कर्तव्याबरोबरच सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवणे ही कल्पना यज्ञ या शब्दातून ध्वनित होते. यज्ञ हे त्यागप्रधान कर्म आहे.

प्राचीन काळी निसर्गाच्या शक्तीवर मानवी जीवन अवलंबून असे आणि मानवाचे भलेबुरे करणारी अशी एक अद्भुत शक्ती निसर्गात आहे अशी समजूत सर्वमान्य होती. त्यामुळे त्या शक्तीला प्रसन्न करून घेण्याच्या हेतूने यज्ञकल्पना प्रथम प्रचारात आली. निसर्गामध्ये असलेल्या आदिम शक्तींना देव मानून त्यांच्यासाठी आपल्या जवळ असलेले पदार्थ समर्पण करणे म्हणजे यज्ञ. यज्ञाच्या द्वारे परमेश्वर प्रसन्न होतो व आपल्याला ईप्सित वस्तू देतो अशी आर्यांची दृढ श्रद्धा होती

यज्ञ व अग्नी यांचा परस्पर संबंध -

अग्नी हा देवतांचे मुख आहे असे मानले जाते. देवतांना अर्पण केलेले पदार्थ अग्नी त्यांना नेऊन देतो म्हणून कोणत्याही देवतेसाठी पदार्थांची आहुती अग्नीत दिली जाते. या दृष्टीने सर्वांचे हविर्द्रव्य त्या त्या देवतेला पोहोचवण्याचे काम अग्नी करतो

| May | | | | | | June | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 | Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 | Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 | Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 | Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 | Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 | Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

9.00 आणि म्हणूनच अग्नीला 'हव्यवाहन' असे नाव मिळाले. देवता या अदृश्यस्वरूप असल्याने
10.00 त्यांना जे समर्पण करायचे ते अग्नीमार्फत असे यज्ञाचे स्वरूप आहे.
11.00 मोठमोठ्या यज्ञप्रसंगी जमलेले पंडित यज्ञविषयक अनेक गोष्टींवर चर्चा करीत. तेथे
12.00 जमलेल्या सामान्य लोकांच्या कानावर या चर्चा पडत असत. त्यातून अन्नदान आणि ज्ञानदान
1.00 हे यज्ञाचे प्रधान अंग बनले. महाभारतकाळापर्यंत यज्ञकल्पनेचा खूपच विस्तार झाला.
2.00 यज्ञ हा शब्द ऋग्वेदात अनेक वेळा आला आहे. आणि बहुतेक वेळा त्याचा अर्थ श्रेष्ठ कर्म
3.00 असाच आहे. प्राचीनकाळी यज्ञोपासना ही कामधेनू-प्रमाणे आहे. सर्वाभीष्टवरदा अशी आहे. श्रेष्ठ
4.00 स्थान मिळवून देण्यासाठी यज्ञ हा एक सोपा मार्ग आहे.
5.00 यज्ञाच्या योगाने पितर तेजस्वी झाले व स्वर्गलोकाला गेले असे ऋग्वेदात म्हटले आहे.
6.00 यज्ञ ही एक नौका असून ती यजमानास तारून नेते. या नौकेचे वर्णन एका ऋचेत केले आहे-
7.00 उत्तम रक्षण करणारी, अत्यंत विशाल, दोषरहित सुखकारक, दैन्यरहित, आनंदकारक, भंगरहित, छिद्ररहित
8.00 अशा यज्ञरूपी नावेने आम्ही उत्कर्ष आणि देवत्व प्राप्त करून घेण्यासाठी आरोहण करतो.
पुरुषसूक्तात यज्ञ शब्दाचा अर्थ कर्म असा आहे,

© www.madhaveerangulveer.com

तर दुसरा अर्थ प्रजापती किंवा विष्णू असा आहे. श्रेष्ठ परमेश्वराप्राप्त्यर्थ देवांनी यज्ञकर्म केले आणि देवांनी अशा प्रकारे जो यज्ञ केला तोच धर्म होऊन राहिला - तानि धर्माणि प्रथमान्यासन्‌।

प्राचीन वैदिक ऋषी सृष्टीतील सर्वच प्रक्रियेला एक मोठा यज्ञ मानत. मानवाला उपदेश करताना ऋग्वेदात एका ठिकाणी असे म्हटले आहे -

दिव्य ज्ञान देणारा व सर्व आपत्तीमधून पार नेण्यास समर्थ असणारा असा हा यज्ञ लोककल्याणासाठी तुम्ही नेहमी आचरा.

ब्राह्मणग्रंथ - आत्मशुद्धी व स्वतः बरोबरच अनेकांचा उद्धार हे यज्ञसंस्थेचे प्रमुख दोन उद्देश आहेत. अग्नीतून यज्ञ उत्पन्न झाला तो यजमानाची पापे जाळतो त्यामुळे यजमानाला ब्रह्मतेज, संपत्ती आणि सुख मिळते त्याचप्रमाणे समाजाच्या कल्याण, सुखासाठीही अनेक यज्ञ सांगितले आहेत. उत्तम पाऊस पडावा, शत्रूंचा नाश व्हावा, समृद्धी वाढावी, कलह मिटावेत, सामंजस्य वाढावे असे अनेक याग समाजहितासाठी सांगितले आहेत.

हे सर्व यज्ञ नीट समजावून घेऊन आणि जाणिवपूर्वक करायचे आहेत. यज्ञकर्म हे शुष्क विधान नाही. ब्राह्मणग्रंथात अनेक वेळा 'य एवं वेद' म्हणजे जो हे जाणतो असे विधान अनेक वेळा आले आहे. यज्ञकर्म हे श्रद्धापूर्वकच केले पाहिजे. श्रद्धेवाचून केलेला यज्ञ व्यर्थच आहे.

कोणतेही कर्म जे सर्वांचे, सर्व प्रकारे, सर्व काळी केवळ कल्याणासाठी केले जाते. ज्यात समर्पणभावना, स्वार्थत्यागाची वृत्ती असते आणि ते ममता व आसक्ती रहित व फळाची अपेक्षा न ठेवता केलेले असते असे प्रत्येक कर्म म्हणजे 'यज्ञकर्म'. यज्ञकर्म म्हणजे एका अर्थाने साम्यवाद होय.

© www.madhaveeraghuveer.com

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

अध्यात्मिक तत्त्वज्ञानासंबंधी विचार करणारे मूलभूत ग्रंथ म्हणजे 'उपनिषदे' होत. नुसत्या कर्मापेक्षा ज्ञान हे केव्हाही श्रेष्ठ अशी कल्पना उपनिषदात अनेक ठिकाणी आली आहे. परंतु कर्माचा आधार घेतल्याशिवाय ज्ञान निराधार आहे म्हणूनच यज्ञाचे सम्यक ज्ञान त्याला असायला हवे.

यज्ञाची प्रक्रिया सांगताना ब्राह्मणग्रंथात एकरूपत्वाची कल्पना मांडली आहे. यालाच बंधुत्व असेही म्हणता येईल.

मानवी जीवन हाच एक यज्ञ आहे व तो अखंड चालणारा आहे.

यज्ञकर्म हे श्रद्धेवर आधारलेले आहे. श्रद्धापूर्वक यज्ञ आचरला तर त्यातून निश्चितपणे फलनिष्पत्ति होते सर्वांना करता येतील असे विष्णुयाग, गणेशयाग, ग्रहयज्ञ चंडीयाग स्मृती व पुराणांमध्ये सांगितले आहेत.

किंवा प्रत्यक्ष यज्ञ न करता रोज स्तोत्रपठण अतिथीसत्कार याद्वारे धार्मिक अधिष्ठान टिकवता येते नुसते रोजचे अन्न खायचे तेसुद्धा 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' असे म्हणून ग्रहण करायचे.

आधुनिक काळातही रोज नाही तरी सामाजिक संस्थांनी काही यज्ञ करणे आवश्यक आहे. शतचंडी याग यज्ञामुळे जे मंत्र म्हटले जातात ते वातावरण शुद्ध व पवित्र करणारे असतात. तथाकथित आधुनिक विचारांचे लोक यज्ञात तूप इ. पदार्थांचा

© www.madhaveeraghuveer.com

अपव्यय होतो म्हणून आरडाओरडा करतात पण त्यातून निर्माण होणारा धूर वातावरण पवित्र करणारा असतो. त्यापेक्षा सिगरेटचा धूर कमी करण्याचा प्रयत्न केला तर प्रदूषण टळेल.

यज्ञाचे प्रमुख तीन प्रकार आहेत.

नित्य - जे यज्ञ केले असता कोणतेही विशेष फळ मिळत नाही परंतु केले नाहीत तर दोष लागतो. उदा० अग्निहोत्र, वैश्वदेव, संध्या.

नैमित्तिक - एखादे निमित्त किंवा कारण घडले असता करायचे यज्ञ या प्रकारात येतात. या यज्ञामुळे त्या त्या कारणामुळे घडणारे दुरित नाहीसे होते किंवा निमित्त चांगले असल्यास त्यापासून अधिक चांगली फलप्राप्ती होते. उदा० नवीन धान्य देवतांना समर्पण करणे. किंवा नवीन फळ किंवा झाडाला आलेले पहिले फूल देवाला वाहणे. महिन्याचा पगार किंवा मिळालेली कुठलीही मोठी रक्कम देवासमोर ठेवणे. त्यामुळे ते फळ फूल वस्तु किंवा पैसा लाभतो. त्याचा चांगल्या रीतीने विनियोग केला जातो.

Sunday 28

काम्य - एखादी विशिष्ट इच्छा मनात धरून ती पूर्ण करून घेण्यासाठी जे लहान मोठे यज्ञ करतात ते सारे 'काम्य' या प्रकारात येतात. उदा० पुत्रप्राप्ती पाऊस पडावा, संकट नाहीसे व्हावे, ऐश्वर्य वाढावे इ० यावरून वैदिक काळातील लोकांच्या भौतिक आकांक्षा काय होत्या हे ध्यानात येते.

© www.madhaveeragnutweer.com

श्रौत यज्ञाचा अधिकारी कोण?

१. ज्याने अध्ययनपूर्वक विद्या संपादन केली आहे.
२. ज्याने आधानपूर्वक अग्नीची स्थापना केली आहे.
३. जो आरोग्यसंपन्न आहे आणि ज्याच्याजवळ यज्ञ करण्याचे सामर्थ्य आहे.

यज्ञाचा ज्योतिषशास्त्राशी, आयुर्वेदाशी आणि आधुनिक शास्त्राशी निकटचा संबंध आहे.

यज्ञो हि श्रेष्ठतमं कर्म हे वैदिक वचन यथार्थ आहे.

विश्वाचे नियमन करणारे जे ऋत त्याचे प्रतीक म्हणजे यज्ञ होय.

हे सर्व यज्ञ कर्मजन्य आहेत. परमात्म्याच्या प्राप्तीसाठी वेगवेगळे यज्ञ का सांगितले? कारण प्रत्येकाची रुची वेगळी असते. ज्यावेळी मनुष्य परमेश्वराची पूजा बांधतो त्यावेळी तो 'स्व' भावानुसार वागतो.

समाजात मिसळायला आवडणारे - कर्मयोगी
प्रेमरूपाने भगवंताला पाहणारे - भक्तियोगी
एकांत सेवन करायला आवडणारे - राजयोगी
सत्याच्या शोधाला लागणारे - ज्ञानयोगी.

प्रत्येकाने आपले स्वरूप आणि स्वभाव ओळखून त्या त्या मार्गाने प्रवास करायचा.

आपला स्वभाव ओळखून नित्यनेमाने एखादा तरी यज्ञ आचरावा.

© www.madhaveeraghuveer.com

(३३) सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।
हे जाणून घ्यायला हवे. परंतु अनुभव आल्याशिवाय कोणतीही गोष्ट कळत नाही.

दधि मधुरं मधु मधुरं द्राक्षा मधुरा सुधापि मधुरैव। तस्य तदेव हि मधुरं यस्य मनो यत्र संलग्नम्।
या सर्व गोष्टी गोड असल्या तरी त्यांच्यात भिन्नता आहे. जिलबी पुरणपोळीहून वेगळी आहे हे खाल्ल्याशिवाय कसे कळणार?

ज्ञानाची थोरवी अशी आहे की त्यामुळे प्रवृत्ती पांगुळते, तर्काची दृष्टी जाते, इंद्रियांना विषयोपभोगांचा विसर पडतो, मनाचे मनपण नाहीसे होते, वाणीला बोलकेपणा थांबतो, ज्ञेय प्रत्यक्ष सापडते, वैराग्याचे दारिद्र्य जाते, विवेकाचा हावरेपणा खुंटतो. आत्मस्वरूप अनुभवता येते. मात्र हे एकदम घडत नाही ज्ञानप्राप्तीसाठी हळूहळू [illegible] व्हावे लागते.

ज्ञान हे कर्माचे डोळे आहेत. द्रव्ययज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे कारण द्रव्ययज्ञाचे फळ नाशिवंत तर ज्ञानयज्ञाचे फळ अविनाशी आहे. केवळ ज्ञानच 'मोक्षप्रदायक' आहे. मग कर्म का करावयाचे? तर कर्म हे ज्ञानाचे पेरवण आहे.

माणसाची सर्व कर्मे ज्ञानाने निःशेष होतात. मानव सत्त्वबुद्धीने कर्मे करीत राहिला की मन व चित्त शुद्ध होते. निष्काम कर्मामुळे ते कर्म ज्ञानात बदलते. त्या विलक्षण आत्मज्ञानामुळे कर्मे निःशेष होतात ते प्राप्त कसे करावे?

© www.madhaveeraghuveer.com

(३४) ते उत्तम ज्ञान जर लाभावे असे मनात असेल
तर या संतांना सर्वस्वाने भजावे कारण ते
ज्ञानाचे घर आहेत. सेवा हा त्या घराचा उंबरठा
आहे. तो स्वाधीन करून घे. गुरूला सद्भावाने
नमस्कार करून निष्कपट भावाने त्यांना (सात्त्विक)
प्रश्न विचारून ते ज्ञान जाणून घे.
प्रश्नकर्ता जो आहे त्यालाही कोणता प्रश्न
विचारायचा हे कळायला हवे आणि मागायचे
काय हेही ठाऊक हवे. मोक्ष मागणारी फारच
थोडी मंडळी आहेत. व्यापक विचार हवा.
अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्॥
शिष्याच्या कसोट्या.
१. प्रणिपात म्हणजे विनम्रता, गुरुविषयी श्रद्धा.
२. प्रश्न म्हणजे जिज्ञासा, आत्मज्ञानाची ओढ.
३. सेवा - गुरूची शुश्रूषा आणि अनन्य शरणागती.
गुरूची कसोटी -
१. सर्वशास्त्रज्ञान (चौफेर ज्ञान)
२. तत्त्वदर्शन (परमात्म्याचा साक्षात्कार)
सद्गुरु व सत्शिष्य - बीज आणि भूमी
सच्छिष्य या पदवीला प्राप्त होण्यासाठी
विषयनिवृत्ती व वैराग्यधारणा या गोष्टी आवश्यकच
नाही तर अपरिहार्य आहेत

©www.madhaveeraghuveer.com

सद्गुरुंची दहा प्रमुख विमल लक्षणे -

१. त्याला शुद्ध ब्रह्मज्ञान असले पाहिजे.
२. निश्चयाचे समाधान
३. स्वरूपस्थिती.
४. प्रबळ वैराग्य
५. उदासीनता
६. अंतर्बाह्य निर्मळ आचरण
७. जनप्रवाह सन्मार्गाकडे वळवणे.
८. सारासारविचार
९. जगदोद्धाराची तळमळ.
१०. नवविधा भक्तिसाधन.

सद्गुरु हा गुरुहून वेगळा असतो. ज्ञानी व तत्त्वदर्शी गुरुच शिष्याला आत्मज्ञानाचे डोळे देऊ शकतो.

अर्जुनाने असे ज्ञानवंत व्हावे म्हणून भगवंत आता सांगतात -

(३१) परमात्मा हेच एकमेव सत्य आहे. जीवात्मा परमात्म्याचा अभेद ज्ञानामुळे प्रत्ययाला येतो. स्थूल दृष्टी मानवते. ज्ञान झाले की एकात्मता प्रत्ययाला येते.

सागर, लाटा, पाणी, तरंग, फेस, बुडबुडे सगळे एकच असतात. हाच प्रत्यय परमेष्टी, समष्टी व व्यष्टी या बाबतीत ज्ञानानेच येतो.

(३६) पापकृत्तमः - पाप्यातील पापी, पापिष्ठ.

पापपुण्य हे जड देहासाठी आहे. आत्म्याला त्याचा स्पर्शही

© www.madhaveeraghuveer.com

होऊ शकत नाही.

पापाचा सागर तरण्यासाठी ज्ञान हीच श्रेष्ठनौका आहे.

(३६) आत्मज्ञानाने संचिताचा नाश होतो.

ब्रह्मज्ञान प्राप्त झाले असता मागील व पुढील पातकांचा स्पर्श न होता त्यांचा नाश होतो

हे ब्रह्मज्ञान प्राप्त कसे करावयाचे?

१. आपली कर्मे शुद्ध व्हावीत यासाठी ती ईश्वरार्पण बुद्धीने करावीत

२. त्यामुळे कर्तृत्व व भोक्तृत्वाचा अहंकार जातो

३. कर्म आपोआपच निष्काम होते. कर्ता, कर्म, करण अशी त्रिपुटी मावळून परमात्म्याचा प्रत्यय येतो.

(३७) ज्ञानाचे पावित्र्य आणि थोरवी –

ज्ञान म्हणजे नुसती माहिती नव्हे.

ज्ञान अर्थमय असते व शब्द हा अर्थवाहक असतो. शब्द हे ज्ञानाचे व्यक्त स्वरूप आहे.

वेद, उपनिषदे, पुराणे, महाकाव्ये इ० सर्व ग्रंथ हे ज्ञानाचे संग्रह आहेत.

ज्ञान हेच अभ्युदय-निःश्रेयसाचे एकमात्र साधन असून समाज सुस्थितीचेही उत्तम साधन आहे.

ज्ञानासारखे दुसरे पवित्र काहीही नाही

ते पवित्र आहे म्हणून कल्याणकारी आहे. ते आत्मोन्नतीकडे नेणारे आहे.

असे हे परम ज्ञान प्राप्त करणाऱ्या पवित्र पुरुषाची लक्षणे आणि ज्ञानप्राप्तीनंतरचे पारमार्थिक

© www.madhaveeraghuveer.com

फळ कोणते ते भगवान सांगत आहेत.

(३८) शास्त्र आणि आचार्य यांनी उपदेशिलेल्या गोष्टी बाबत स्वतः ला अनुभव नसला तरी हे असेच आहे असा जो त्या गोष्टींविषयी विश्वास धरला जातो त्याला श्रद्धा असे नाव आहे.

म्हणे दास विश्वासता मुक्ति लाहे। — समर्थ

श्रद्धा जितकी अविचल, दृढ असेल तितका यशाचा संभव अधिक असतो.

श्रद्धा ही सत्त्वापासून उत्पन्न झाली व ती सर्व प्राणिमात्रांचे रक्षण पोषण करणारी आहे.

श्रद्धेच्या योगानेच सत्य म्हणजे परमेश्वर सापडतो.

श्रद्धेने ज्ञानप्राप्ती होते. त्यामुळे परमशांति लाभून मानव मोक्षाचा लाभ घेतो.

(४०) परंतु जो श्रद्धावंत नाही त्यांची गती कोणती होते? अश्रद्धांना इहलोक व परलोक दोन्हीही अप्राप्य! ज्यांची शास्त्रांवर वा गुरुवचनावर श्रद्धा नसते ते अज्ञानाचे, अविद्येचे बळी असतात.

रोग्याला जसे पौष्टिक अन्न पचत नाही, तसेच मानसिक रोगी असलेले आणि चंगळवादाचा पुरस्कार करणारे जे असतात त्यांना चांगले, सात्त्विक विचार मानवत नाहीत. स्वतः बरोबरच ते समाजाचाही घात करतात. असे घातकी लोक स्वार्थाने बरबटलेले असतात. अशा अधमांना इहलोक व परलोक दोन्ही इष्ट होत नाहीत.

Sunday 05

© www.madhaveeraghuveer.com

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

| July | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 27 | 28 | 29 | 30 | 31 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

(२७) (४२) आत्मज्ञान विकत घेता येत नाही
आत्मज्ञानी माणसाचे कर्मबंधन तुटते.

आत्मज्ञान झाले की जीव जगत जगदीश या संबंधातील संशय नाश पावतात

शेवटी या अध्यायाची सांगता करताना एक सुंदर रूपक वापरले आहे. भगवंत अर्जुनाला अंतःकरणातील या संशयाला ज्ञानखड्गाने छेदून टाकण्यास सांगत आहेत.

ज्ञान आणि भौतिक विज्ञान यात फरक आहे विज्ञानाची सगळी साधने विकत घेता येतात किंवा मोठमोठी पुस्तके, ग्रंथ विकत घेता येतात परंतु ज्ञान हे पैसे मोजून मिळत नाही.

आत्मज्ञान एका दिवसात प्राप्त होत नाही. ती दीर्घ तपश्चर्या आहे. आत्मज्ञान म्हणजे अपरोक्ष ज्ञान! अपरोक्ष ज्ञानाच्या प्राप्तीसाठी श्रद्धा हवी.

हे अपरोक्ष ज्ञान कोणाला प्राप्त होते? जो श्रद्धावंत आहे, संयतेंद्रिय आहे. ज्ञानसेवेसाठी गुरुसेवेला तत्पर आहे. त्यालाच हे ज्ञान मिळते.

मोक्ष मिळवून देणारे हे आत्मज्ञान व्हावे म्हणून यज्ञकर्म आचरावे लागते (स्वकर्तव्य) अर्जुनाने तेच करावे असे भगवंत सांगतात आणि निःशंकपणे युद्ध करण्याची आज्ञाही देतात.

© www.madhaveeraghuveer.com